# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- दिव्यांगांना बाधामुक्त वातावरण निर्माण करून देण्याला समाजाने प्राधान्य द्यावं–राष्ट्रपतींचं आवाहन
- सुगम्य भारत–सुलभ भारत अभियानाला नऊ वर्ष पूर्ण–आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन विविध कार्यक्रमांनी साजरा
- सिटीझन फर्स्ट हा भारतीय न्याय संहितेचा मूलमंत्र असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

आणि

- आकांक्षित तालुका कार्यक्रमाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या किनवटचा राज्यात चौथा क्रमांक

****

दिव्यांगांना बाधामुक्त वातावरण निर्माण करून देणं, याला समाजाने प्राधान्य द्यावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. काल आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त दिल्लीत दिव्यांग सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. दिव्यांगांना सहजता आणि समानतेची वागणूक देणं हे समस्त मानवतेचं कर्तव्य असल्याचं त्यांनी नमूद केलं.

यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे.

****

दरम्यान, केंद्र सरकारनं सुरु केलेल्या सुगम्य भारत, सुलभ भारत अभियानाला काल नऊ वर्षं पूर्ण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांग लोकांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी २०१५ मध्ये `दिव्यांग` शब्द वापरण्यास सुरुवात करण्याचं आवाहन केलं होतं. `सुगम्य भारत अभियान` आणि `एक देश, एक सांकेतिक भाषा` यासारख्या पावलांमुळे दिव्यांगांच्या जीवनात बदल घडून आला आहे.

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनाच्या औचित्याने काल ठिकठिकाणी विविध कार्यक्रम घेण्यात आले. छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी, दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी प्रशासकीय विभागांसोबतच विविध संघटनांनी सहकार्य करण्याचं आवाहन केलं. २०२४-२५ या वर्षादरम्यान निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थींना घरकुल, निर्वाह भत्ता, तीन चाकी स्कूटर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आल्या. समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे यांनी याबाबत अधिक माहिती दिली...

***''विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच स्कूटर याचे वाटप करण्यात आलेले आहे. काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरती प्राविण्य मिळवलेले असल्याने त्यांचाही सत्कार यानिमित्ताने करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर लवकरच दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. समाज कल्याण विभाग नेहमीच दिव्यांग लाभार्थ्यांसाठी उत्कृष्ट पद्धतीने कार्य करत आहे.''***

****

परभणी तसंच बीड इथं दिव्यांग दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. तर लातूर इथं दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आली. जिल्ह्यातल्या ४६ शाळांमधले २९७ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. समूहनृत्य, समूह गायनासह देशभक्ती गीतांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केलं.

दिव्यांग दिनानिमित्त नांदेड इथं जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. समाजाने दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन करनवाल त्यांनी केलं.

दरम्यान, नांदेडमध्ये बेरोजगार दिव्यांग कल्याण कृती संघर्ष समितीच्यावतीने विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

धाराशिव इथं भारतीय जनता पक्षाच्या दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने आळणी इथल्या स्वआधार मतिमंद मुलींच्या शाळेत फळांचा वाटप करण्यात आलं.

****

एका खासगी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी कालही निदर्शनं केली. लोकसभेचं कामकाज सुरू होताच, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या मुद्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. मात्र हे मुद्दे शून्य प्रहरात उपस्थित करावेत, असं अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या खासदारांनी काही काळासाठी सभात्याग केला. शून्यकाळात समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव यांनी, संभल प्रकरण हे सुनियोजित षड्यंत्र असल्याचा आरोप करत, या प्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी केली.
राज्यसभेतही समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी संभल हिंसाचारप्रकरणी प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर समाजवादी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला.
दरम्यान, लोकसभेत काल बँकिंग कायदा सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू झाली, तर राज्यसभेनं आईलफिल्ड नियमन आणि विकास सुधारणा विधेयकाला मंजुरी दिली.

****

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, तसंच केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या सर्व शाखांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावं, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. काल मुंबईत केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते. या संस्थेच्या शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन, तसंच संस्थेनं विकसित केलेली दोन नवी तंत्रज्ञानं आणि संस्थेच्या कामाशी संबंधित तीन पुस्तकांचं प्रकाशनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते झालं. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, संस्थेचे पदाधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

****

सिटीझन फर्स्ट हा भारतीय न्याय संहितेचा मूलमंत्र असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशभरात नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी झाल्यानंतर पंतप्रधानांनी काल चंडीगढ इथं या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या प्रात्यक्षिकांचं अवलोकन केलं, त्यानंतर ते बोलत होते. आपल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले…

*''भारतीय न्याय संहिता का मूलमंत्र है सिटीजन फर्स्ट। ये कानून नागरिक अधिकार के प्रोटेक्टर बन रहे है। ईज ऑफ जस्टीस का आधार बन रहे है। पहले एफ आय आर करवाना भी कितना मुश्किल होता था। लेकिन अब झीरो एफ आय आर को भी कानुनी रूप दे दिया गया है।''*

****

पंतप्रधान मोदी उद्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. नवनिर्वाचित सरकारच्या शपथग्रहण सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत. उद्या सायंकाळी आझाद मैदानावर होणाऱ्या या सोहळ्याच्या तयारीची महायुतीतल्या नेत्यांनी काल पाहणी केली. या सोहळ्याला विविध राज्यांचे मुख्यमंत्री, साधू महंत, कलाकार, साहित्यिक यांनाही निमंत्रित केलं जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

दरम्यान, नागपूरच्या रामनगर इथं चहाचं दुकान चालवणारे गोपाल बावनकुळे यांना शपथग्रहण समारोहात उपस्थित राहण्याचं निमंत्रण फोन द्वारे मिळालं आहे. गोपाल बावनकुळे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे चाहते म्हणून ओळखले जातात.

****

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत दादर इथं चैत्यभूमीवर होणाऱ्या कार्यक्रमाच्या तयारीचा काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल आढावा घेतला. या तयारीमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

****

नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या किनवट तालुक्याने राज्यातून चौथा तर संपूर्ण देशातून ५१ वा क्रमांक पटकावला आहे. याबाबत आमचे प्रतिनिधी अनुराग पोवळे यांनी घेतलेला हा आढावा…

*"संपूर्णत: अभियानात सहा सूचकांवर विशेष लक्ष केंद्रीत करुन काम करण्यात आलं. यात प्रामुख्याने प्रसूतीपूर्व काळजीसाठी नोंदणी केलेल्या गर्भवती महिलांची टक्केवारी ही ९४ टक्क्यांवरुन ९७ टक्के, मधुमेहासाठी तपासणी केलेल्या व्यक्तींची, तसंच उच्च रक्तदाबासाठी तपासणी केलेल्या व्यक्तींची टक्केवारी ही ८५ वरुन १०० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. पूरक पोषण आहार घेणार्या गर्भवती महिलांची टक्केवारी १०० टक्के कायम ठेवण्यात यश आलं आहे. मृदा आरोग्य पत्रिकेची टक्केवारी शून्य वरुन १०० टक्के पूर्ण*

***करण्यात आली आहे. तालुका स्तरावरील प्रगती वेगवान करण्यासाठी विविध विकास भागीदारांसोबत काम करुन सुधारणा करण्यात येत आहे.''***

**अनुराग पोवळे, नांदेड.**

****

तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याचे माजी संस्थापक संचालक बंकटराव कदम यांचं काल जळकोट इथं निधन झालं. कदम यांनी कुलस्वामिनी सहकारी सूतगिरणीचे संस्थापक संचालक, जळकोटचे माजी सरपंच, पार्वती कन्या प्रशालेचे अध्यक्ष, महाराष्ट्र वाचनालयाचे अध्यक्ष अशी अनेक पदं भूषवली आहेत. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

जागतिक शौचालय दिनानिमित्ताने बीड जिल्ह्यात १४ नोव्हेंबरपासून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. आमचे शौचालय आमचा सन्मान या मोहिमेत जिल्ह्यातल्या सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग घ्यावा, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केलं आहे.

****

लातूर इथं सुरू असलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा आज समारोप होत आहे. ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

****

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त काल परभणीतील देवगिरी सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आलं. जिल्ह्यातले सर्व वार्ताहर, प्रतिनिधी पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेते यांची यावेळी तपासणी करण्यात आली.

****

धाराशिव जिल्ह्यातली २२ शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र आणि पाच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपल्या दवाखान्याच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. पूर्वी दुपारी २ ते रात्री १० अशी असलेली ही वेळ आता बदलून दुपारी १२ ते रात्री ८ अशी करण्यात आली आहे.

****

हवामान

फेंजल चक्रीवादळाच्या परिणामी पुढच्या ४८ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. छत्रपती संभाजीनगर तसंच जालना परिसरात आज पहाटे पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

****